# केंद्रशासनाचा माहितीचा मिळविण्याचा अधिकार अधिकार २००५

## नमुनापत्र -३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना




प्रति,

मा.शासकिय जन माहिती अधिकारी

उदयान विभाग,

मिरा भाईंदर ,

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव : श्री.गणेश बजरंग दिघे

[illegible]

मो. क्र. ९९६७११२२२४

रूम नं. ११८, आर /१, मनउपास, मिरा

काशिमिरा ता. जिल्हा- ठाणे,

पिन :४०११०७.

२) माहितीचा विषय : हिरावती इंटर प्रायजेस्च्या ठेक्याची संपुर्ण माहिती मिळणेबाबत

३) (एक) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : हिरावती इंटरप्रायजेस् आणि प्रभाग संमिती क्रमांक ४,५,६ मध्ये पुरवठा करण्यात येत असलेल्या ठेका मजुरांचे नांवे व आधार कार्ड व ठेका दिल्यापासून आजतागायत हजेरी पुस्तिकेच्या छायांकित प्रती पुरविणे

४) दोन) ज्यासाठी माहिती हवी त्याचे प्रयोजन :-

तीन) माहिती ज्याच्याशी संबंधीत असेल तो कालावधी : ३० दिवसाच्या आत

चार) माहिती टपालाद्वारे किंवा :टपालाने

पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत : ........

अर्जदार दरिद्रयरेषेखाली आहे किंवा :- नाही.

असे असल्यास त्यांच्या पुराव्यासहीत छायांकित प्रत जोडावी )

अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण :भाईंदर (प.)

दिनांक : २२ /०९/२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. ६४ दि. २२/०९/२०२३
2023=28

उप. मुख्य उद्यान अधिक्षक

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ ७० /२०२३-२४ दिनांक : २७/०९/२०२३

माहितीचा अधिकार

प्रति,
मे.हिरावती इंटरप्रायजेस
आर आर यादव कंपाऊड
कनोसा स्कुल,महाकाली केव्हस रोड,
शेर -ए पंजाब
अंधेरी (पु.)

O/C

**विषय :-** केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान विभाग प्रभाग समिती क्र. ४,५ व ६ मध्ये हिरावती इंटरप्रायजेस च्या ठेक्याची पुर्ण माहिती मिळणेबाबत.

**संदर्भ :-** श्री.गणेश बजरंग दिघे यांचा दि.२२/०९/२०२३ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रामधील उद्यान विभाग प्रभाग समिती क्र. ४,५ व ६ मध्ये आपल्या वत्तीने पुरवठा करण्यात येत असलेल्या ठेका मंजुराची नावे, आधार कार्ड तसेच हजेरी पुस्तकांच्या छायांकित प्रती मिळणे बाबत श्री.गणेश बजरंग दिघे यांनी दि.२२/०९/२०२३ रोजीच्या माहिती अधिकार अर्जाअन्वये कळविलेले आहे.

तरी सदर माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने सदरची माहिती त्वरीत या कार्यालयास सादर केल्यास संबधीत माहिती अधिकार अर्जदारास माहिती उपलब्ध करणे सोईस्कर होईल.

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव:-
श्री.गणेश बजरंग दिघे
रुम नं ११८, आर/ १, मनउपास,
मिरा काशिमिरा

Rahulyadav

अधिकारी अधिकार
दि. ३/११/२०२३
प/१९४३

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१८४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/वृ प्रा/मिरारोड/५३३/२०२१-२२ दिनांक : २८/१०/२०२१

// कार्यादेश //

प्रति,
मे. हिरावती इंटरप्रायजेस,
आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,
अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३

विषय:- मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागा करीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे.

संदर्भ:- १) मा. विशेष महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१
२) मा. आयुक्त सो. यांची दि. ०५/०५/२०२१ रोजीची मान्यता.
३) दि.०७/०५/२०२१ रोजी दै. ठाणे वैभव व दै. द ग्लोबल टाईम्स व ई-टेंडरीग पद्धतीने जाहीर निविदा प्रसिध्दी.
४) मा. निविदा समिती दि. १७/०८/२०२१ रोजीची मान्यता.
५) मा.आयुक्त सो. यांची दि. ०३/०९/२०२१ रोजीची मंजुरी.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४ दि. २९/०९/२०२१ रोजीची मंजुरी.
७) मा. आयुक्त सो. यांची दि. १२ /१०/२०२१ रोजीची मंजूरी.
८) दि.२८ /१०/२०२१ रोजीचा करारनामा.
९) जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ५३२ /२०२१-२२ दि. २८ /१०/२०२१ रोजीचा वार्षिक कार्यादेश.

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागा करीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाली करीता मजुर पुरवठा करणेकामी निविदेतील, गोषवाऱ्यामधील व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रभाग समिती क्र. | प्रति दिन मजुर पुरवठा | मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे (कालावधी १ वर्ष) | प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ | ७५ प्रति दिन | रु. १,१६०/- प्रति दिन/ प्रति मजूर |

सदर मजुर पुरवठा करण्याचा कालावधी दि. ०१/११/२०२१ ते दि. ३१/१०/२०२२ पर्यंत राहील.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

29/10/2021

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

२८/१०
(संजय शिंदे)
उप. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

G:\OLD BACKUP DATA\2021-22\Karyadesh\Hiravati enterprises

ट/१७७

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स : २८१९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे-४०११०१

जा.क्र.: मनपा/वृ.प्रा.-मिरारोड/५३२/२०२१-२२ ok दिनांक : २८/१०/२०२१

// वार्षिक कार्यादेश //

प्रति,
मे. हिरावती इंटरप्रायजेस,
आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,
अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३

विषय:- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागा करीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे.(१ वर्षाकरीता)

संदर्भ:- १) मा. विशेष महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१
२) मा. आयुक्त सो. यांची दि. ०५/०५/२०२१ रोजीची मान्यता.
३) दि.०७/०५/२०२१ रोजी दै. ठाणे वैभव व दै. द ग्लोबल टाईम्स व ई-टेंडरींग पद्धतीने जाहीर निविदा प्रसिध्दी.
४) मा. निविदा समिती दि. १७/०८/२०२१ रोजीची मान्यता.
५) मा.आयुक्त सो. यांची दि. ०३/०९/२०२१ रोजीची मंजुरी.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४ दि. १९/०९/२०२१ रोजीची मंजुरी.
७) मा. आयुक्त सो. यांची दि.१२ /१०/२०२१ रोजीची मंजूरी.
८) दि.२८ /१०/२०२१ रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागा करीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाली करीता मजुर पुरवठा करणेकामी निविदेतील, गोषवाऱ्यामधील व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार खालील प्रमाणे वार्षिक कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | Items | मंजुर दर |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे (कालावधी १ वर्ष) | रु. १,१६०/- प्रति दिन/ प्रति मजूर (०८ तास) |

सदर मजुर पुरवठा करणे कामाचा वार्षिक कालावधी दि. ०१/११/२०२१ पासून दि. ३१/१०/२०२२ पर्यंत राहील.

२८/१०

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

२९/१०/२०२१

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

(संजय शिंदे)
उप. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

G:\OLD BACKUP DATA\2021-22\Karyadesh\Hiravati enterprises

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.४, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मे. हिरावती इंटरप्रायजेस यांना मजुर पुरवठा करणे कामी वितरीत करण्यात आलेली रक्कम**

| अ.क्र. | महिना | वर्ष | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | नोव्हेंबर-२१ | | रु.२४,९४,०००/- |
| २ | डिसेंबर-२१ | | रु.२४,९८,६४०/- |
| ३ | जानेवारी-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| ४ | फेब्रुवारी-२२ | | रु.२४,०३,५२०/- |
| ५ | मार्च-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| | | सन २०२१-२२ | रु.१,२३,९३,४४०/- |
| ६ | एप्रिल-२२ | | रु.२४,९४,०००/- |
| ७ | मे-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| ८ | जुन-२२ | | रु.२४,९४,०००/- |
| ९ | जुलै-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| १० | ऑगस्ट-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| ११ | सप्टेंबर-२२ | | रु.२४,९४,०००/- |
| १२ | ऑक्टोबर-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| १३ | नोव्हेबर-२२ | | रु.२४,९४,०००/- |
| १४ | डिसेंबर-२२ | | रु.२४,९८,६४०/- |
| १५ | जानेवारी-२३ | | रु.२४,९८,६४०/- |
| १६ | फेब्रुवारी-२३ | | रु.२४,३६,०००/- |
| १७ | मार्च-२३ | | रु.२४,९८,६४०/- |
| | | सन २०२२-२३ | रु.२,९९,०२,४८०/- |
| १८ | एप्रिल-२३ | | रु.२४,९४,०००/- |
| १९ | मे-२३ | | रु.२४,९८,६४०/- |
| २० | जुन-२३ | | रु.२४,९४,०००/- |
| २१ | जुलै-२३ | | रु.२४,९८,६४०/- |
| २२ | ऑगस्ट-२३ | | रु.२३,७५,६८०/- |
| २३ | सप्टेंबर-२३ | | रु.२२,९६,८००/- |
| | | सन २०२३-२४ | रु.१,४६,५७,७६०/- |
| | | एकुण | रु.५,६९,५३,६८०/- |

14

Validate Print Help

## Item Rate BoQ

Tender Inviting Authority: Dy. Commissioner (Garden)

Name of Work: Under minimum wages act. 1948 Employee should be appointed for maintenance n care taker of trees planted on both the side of the road under tree authority department Mira
Contract No: MBMC/Tree authority/miraroad/53/2021-22 Dt. 07/05/2021

| Name of the Bidder/ Bidding Firm / Company : | Hiravati Enterprises | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PRICE SCHEDULE | | | | | | | |
| NUMBER # | TEXT # | NUMBER # | TEXT # | NUMBER | NUMBER # | NUMBER # | TEXT # |
| Sl. No. | Item Description | Quantity | Units | Estimated Rate in Rs. P | BASIC RATE In Figures To be entered by the Bidder Rs. P | TOTAL AMOUNT With Taxes in Rs. P | TOTAL AMOUNT In Words |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 13 | 53 | 55 |
| 1 | Under minimum wages act. 1948 Employee should be appointed for maintenance n care taker of trees planted on both the side of the road under tree authority department Mira Bhayander Municipal Corporation. (For 1 year) | | | | | | |
| 1.01 | ITEM NO.1 Date 01/01/2021 to 30/06/2021 | 1.000 | Per Day/Per Labour | | 1229.00 | 1229.00 | INR One Thousand Two Hundred & Twenty Nine Only |
| 1.02 | ITEM NO.2 Date 01/07/2021 to 31/12/2021 | 1.000 | Per Day/Per Labour | | 1296.00 | 1296.00 | INR One Thousand Two Hundred & Ninety Six Only |
| Total in Figures | | | | | | 2525.00 | INR Two Thousand Five Hundred & Twenty Five Only |
| Quoted Rate in Figures | | | Select | | | 0.0000 | Zero Only |
| Quoted Rate in Words | INR Two Thousand Five Hundred & Twenty Five Only | | | | | | |

## MIRA BHAYANDER MUCIPAL CORPORATION

Gr. Floor Ward committee No. 04, Vilasrao Deshmukh Bhavan, Jangid Enclave Kanakia, Miraroad (East) Tal.Dist.- Thane. 401107 Tel.No. 28103409

### *Commerical Bid*

**Name Of Work –** **As per minimum wages act. 1948 Employee should be appointed for maintenance and care taking of trees planted on both the side of the road and under tree authority department Mira Bhayander Municipal Corporation. (For 1 year)**

**Name Of Agency :** Hiravati Enterprises

**& Add.** :

**Agency's Owner Name :** Sushant T. Yadav

**& Add.** : HIRAVATI ENTERPRISES
R.R. Yadav Compound, Shere-punjab,
Near Canossa Girl High School,
Mahakali R... ...mbai-93.

| Sr.No. | Items | Rate Per Unit (including all taxes) | |
|---|---|---|---|
| | | Date 01/01/2021 to 30/06/2021 | Date 01/07/2021 to 31/12/2021 |
| 1 | As per minimum wages act. 1948 Employee should be appointed for maintenance and care taking of trees planted on both the side of the road and under tree authority department Mira Bhayander Municipal Corporation. (For 1 year) | Rs. 1229 /- Per Day/Per Labour | Rs. 1296 /- Per Day/Per Labour |

Place :- Mumbai -93

Date :- 22/05/2021

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93

Agency's Seal & Signature

प/१६७ ८

ठेकेदाराचे नांव :- मे. हिरावती इंटरप्रायजेस,
आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,
अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३

कामाचे नांव :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागा करीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे. (१ वर्षाकरीता)

## CHALLAN
### MTR Form Number-6

| | | | | |
|---|---|---|---|---|
| GRN MH008141031202122E | BARCODE | | Date 28/10/2021-13:11:39 | Form ID |

| | | | |
|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| Type of Payment | Non-Judicial Stamps<br>Non-Judicial Stamps | TAX ID / TAN (If Any) | |
| | | PAN No.(If Applicable) | AAXPY7712Q |
| Office Name | GENERAL STAMP OFFICE MUMBAI | Full Name | HIRAVATI ENTERPRISES |
| Location | MUMBAI | | |
| Year | 2021-2022 One Time | Flat/Block No. | RR YADAV COMPOUND |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | Premises/Building | |
| 0030052601 Amount of Tax | 50000.00 | Road/Street | SHERE PUNJAB MC RD ANDHERI |
| | | Area/Locality | MUMBAI |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 0 0 0 9 3 |

Remarks (If Any)

STAMP DUTY ON MAINTENANCE N CARE TAKER OF TREES PLANTED UNDER TREE AUTHORITY MBMC

| | | | |
|---|---|---|---|
| Total | 50,000.00 | Amount In Words | Fifty Thousand Rupees Only |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Payment Details | IDBI BANK | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN Ref. No. | 69103332021102816076 | 2710185174 |
| Cheque/DD No. | | Bank Date RBI Date | 28/10/2021-13:13:06 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | IDBI BANK | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll | |

Mobile No. : 9867336543

Department ID :
NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.



Print Date 28-10-2021 01:13:23

ग्रा१९५८ 8

# // करारनामा //

हा करारनामा दिनांक /१०/२०२१ रोजी करण्यात येत आहे.. हा करारनामा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित मिरा भाईदर महानगरपालिकेच्या वतीने उप. आयुक्त (उद्यान), श्री. संजय शिंदे, पत्ता – मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), जि. ठाणे. यांचेमार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल आणि मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्यावतीने त्यांचे प्रोप्रायटर श्री. सुशांत तिर्थराज यादव. पत्ता – आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३ यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल, यांच्यामध्ये करारनामा होत आहे.

ज्याअर्थी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ अन्वये प्रस्थापित झालेली मिरा भाईदर महानगरपालिका ही प्रथम पक्षीय असून मे. हिरावती इंटरप्रायजेस. हे व्दितीय पक्षीय आहेत. ज्याअर्थी मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा-अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे(कालावधी १ वर्ष)आवश्यक आहे.

त्याअर्थी मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाली करीता मजुर पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यते नुसार व मा. आयुक्त यांच्या दि. ०५/०५/२०२१ रोजीच्या मान्यतेने मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करीता मजुर पुरवठा करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने दि.०७/०५/२०२१ रोजी दै. ठाणे वैभव व दै. द ग्लोबल टाईम्स या वृत्तपत्रात जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीत ०५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त ०५ निविदाधारकांची Technical Bid दि.२५/०५/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे. तसेच मा. निविदा समिती समोर कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र ०२ निविदाधारकांची दि.०२/०८/२०२१ रोजी Financial Bid उघडण्यात आलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | निविदाधारकाचे नाव | सादर केलेले दर | दर वाटाघाटीनंर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे(कालावधी १ वर्ष) (वृक्षांची निगा व देखभाली करीता लागणाऱ्या साहित्यासह) | मे. हिरावती इंटरप्रायजेस | Rs. १२९६/- प्रति दिन/प्रति मजूर | Rs. ११६०/- प्रति दिन/प्रति मजूर |
| | | मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस | Rs. १४८५/- प्रति दिन / प्रति मजूर | |

उपरोक्त प्रमाणे निविदा दर सुचीमध्ये L१ निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटीअंती वरील प्रमाणे दर कमी केलेले असून मे. हिरावती इंटरप्रायजेस यांची वाटाघाटाअंती आलेली कमी दराची निविदा स्विकारण्यास मा.निविदा समितीने दि.१७/०८/२०२१ रोजी शिफारस केलेली असून त्यास मा. आयुक्त यांनी दि. ०३/०९/२०२१ रोजी मान्यता दिलेली असून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत "मजुर पुरवठा/निगा व देखभाल" या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लाख (रु.एक कोटी मात्र) व उद्यान विभाग अंतर्गत "मजुर पुरवठा" या लेखाशिर्षाखाली रु.९००.०० लाख (रु. नऊ कोटी मात्र) ची तरतूद करण्यात आलेली असून सदर कामाकरिता अंदाजे रु.३५०.०० लाख (रु.तीन लाख कोटी पंन्नास लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. सदर कमी दराची मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्या वार्षिक निविदेस प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ८४ दि. २९/०९/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे उप. आयुक्त यांच्या स्वाक्षरीने स्वीकृती पत्र देणे, करारनामा करुन कार्यादेश देणेकामी मां.आयुक्त सो. यांनी दि. १२/१०/२०२१ रोजी मान्यता दिली आहे.

सदर निविदेची प्रत Annexure No. "A" म्हणून संबोधण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय हे मे. हिरावती इंटरप्रायजेस या नावाने व्यवसाय करीत आहेत आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

आणि ज्याअर्थी अटी व शर्तीनूसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीयांना बंधनकारक आहेत.

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत

१. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोप[illegible] आलेल्या

येणार नाही.

४. किमान वेतन कायदा १९४८ च्या नियमानुसार ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना वेतन विमा, प्रोव्हिडंट फंड, बोनस, रजा व इतर सवलती इत्यादी बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षाची राहील. प्रथम पक्ष याकरीता कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. त्याच प्रमाणे या बाबतच्या संदर्भातील नियमावलीनुसार आवश्यक त्या नोंदवह्या व नोंदी अद्यावत ठेवणे द्वितीय पक्षास बंधनकारक आहे.

५. कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्ट १९७० व १९७१ अन्वये कंत्राटी मजुरांचा गटविमा, इ.एस.आय.सी. प्रोविडंट फंड, मेडिक्लेम, बोनस इ. इ. भत्ते कामगारांना देणे बंधनकारक आहे. प्रत्येक महिन्यात कंत्राटी कामगारांचे पी.एफ. ची रक्कम कामगारांच्या वैयक्तिक खात्यावर जमा करणे हे शासकीय नियमानुसार बंधनकारक असुन द्वितीय पक्ष यांनी सदर पी.एफ. ची रक्कम जमा केल्याबाबतची प्रत देयका सोबत जोडणे द्वितीय पक्षास बंधनकारक आहे. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

६. द्वितीय पक्षीयांनी कंत्राट पध्दतीने कामे करताना प्रचलित शासनाचे नियम, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परीपत्रक, आदेश, सुचना, महानगरपालिकेचे आदेश, परीपत्रक, सुचना, ठराव यांचे पालन / अमलबजावणी करणे व तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने संबंधीत कार्यालयाकडुन घेणे द्वितीय पक्षास बंधनकारक राहील.

७. बाल मजुर कायद्याचे पालन करणे द्वितीय पक्षास बंधनकारक राहील.

८. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार किंवा महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या नियामांची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी द्वितीय पक्षाची राहिल.

९. कंत्राटी कामगार नियम १९७१ च्या नियम ५५ नुसार रजिस्टर तयार करावयाचे असल्यामुळे नमुनां क्र. VIII मध्ये नमुद केलेल्या तपशीलाची सर्व अचुक माहिती प्रथम पक्ष यांना वेळोवेळी पुरविण्याची जबाबदारी द्वितीय पक्ष यांची राहील.

१०. दररोज ठरवून दिलेल्या कामाच्या वेळेत कामाच्या ठिकाणी स्वखर्चाने मजुर आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षाची राहील तसेच ठेका मजुर दैनंदिन हजेरी बाबतची नोंद नोंदवही मध्ये ठेवून त्यावर संबंधीत प्र.उप. मुख्य उद्यान अधिक्षक यांच्या स्वाक्षरीनिशी उप-आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांचेकडे सादर करणे द्वितीय पक्षास बंधनकारक राहिल.

११. अ) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत वाढीव विशेष भत्याची (D.A.) रक्कम देणे बंधनकारक असल्याने, वेळोवेळी होणाऱ्या बदला नुसार विशेष भत्यामध्ये (D.A.) होणाऱ्या वाढीनुसार रक्कम मनपाकडुन ठेकेदारास अदा केली जाईल व सदरच्या वाढीव दरानुसार किमान वेतन सर्व कर्मचारी यांना अदा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

ब) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत किमान वेतनामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार वाढीव रक्कम मनपाकडुन ठेकेदारास अदा केली जाईल.

१२. सदर मजुर स्त्री/पुरुष हे महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार कमी जास्त प्रमाणात मनपा निर्देश देईल त्या प्रमाणात पुरवठा करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीयांची राहील.

१३. कंत्राटाच्या कालावधी द्वितीय पक्ष यांनी मजुरांचा पुरवठा खंडीत केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ठेका रद्द करण्यात येईल.

१४. एखादा मजुर काम सोडुन गेल्यानंतर तात्काळ नविन मजुर पुरवठा करण्याचे द्वितीय पक्ष यांनी मान्य केले आहे.

१५. द्वितीय पक्ष यांनी काम समाधानकारक केल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागाचे प्र. उप. मुख्य उद्यान अधिक्षक यांच्याकडुन प्रमाणित करुन सादर केल्याशिवाय देयक अदा करण्यात येणार नाही.

१६. महानगरपालिकेच्या आवश्यतेनुसार वृक्ष प्राधिकरण विभागाचे प्र. उप. मुख्य उद्यान अधिक्षक व वरीष्ठ यांच्या आदेशानुसार सर्व कामे करण्याची जबाबदारी द्वितीय पक्षाची राहील.

१७. द्वितीय पक्ष यांनी प्रत्ये महिन्यास कामगारांना वेळच्या वेळी किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा (प्रत्येक महिन्याच्या ... तारखेच्या आतमध्ये) करणे बंधनकारक राहील.

१८. प्रत्येक कामगारांना साप्ताहिक सुट्टी देणे, नेमलेल्या कामगारांना रजा व इतर सवलती इत्यादी बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी द्वितीय पक्ष यांची राहील. याबाबत प्रथम पक्षाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच ठेका मजुरांचे (स्त्री/पुरुष) काम दररोज दोन शिफ्ट मध्ये आणि पावसाळ्यात व आपतकालीन परिस्थीतीत तीन शिफ्टमध्ये करावे

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93

५।९५५

लागणार असल्याने त्याप्रमाणे तीनही शिफ्ट करीता ठेका मजुर (स्त्री/पुरुष) पुरवठा करणे बंधनकारक आहे. तसेच साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी बदली कर्मचारी देण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील.

१९. व्दितीय पक्षाच्या कामाबाबत अनियमितता, तक्रारी तसेच काम समाधानकारक न आढळल्यास सात दिवसाची लेखी नोटीस देऊन सदरचा ठेका रद्द करण्यात येईल असे व्दितीय पक्ष यांनी मान्य केले आहे.

२०. कंत्राटी कामगार कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख (उदा. हजेरी नोंदवही, वेतन वाटप नोंदवही, दैनंदिन कामाच्या नोंदवही व इतर आवश्यक नोंदवह्या इ.) ठेवणे व सदर नोंदवह्या संबंधित उद्यान अधिक्षक यांचेकडून दर महिन्यास तपासणी करणे व्दितीय पक्षास बंधनकारक आहे.

२१. व्दितीय पक्षात व कामगारामध्ये कोणताही तंटा/वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका हस्तक्षेप करणार नाही.

२२. व्दितीय पक्ष यांनी प्रत्येक मजुराला कॉन्ट्रेक्ट लेबर अॅक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्रे देणे बंधनकारक असुन कामगारांचे ओळखपत्र स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे व कामाच्या दिवशी सदर ओळखपत्र मजुरांकडे असल्याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

२३. मंजुर दराप्रमाणे मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मजुर पुरवठा आवश्यकतेनुसार कमी अगर जास्त करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

२४. सदर कामाची संपुर्ण पुर्तता निविदेतील व करारनाम्यामधील अटीशर्तीनुसार करण्याची संपुर्ण जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील. यात हयगय झाल्यास व त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान व त्यांचे भरपाईस् व्दितीय पक्ष जबाबदार राहतील.

२५. ठेका मजुर कामगारांना गणवेश देऊन त्यावर कंपनीचे नाव लिहिण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील.

२६. मजुरांना सुरक्षा विषयक साहित्य उदा. ग्लोज, गमबुट, रेनकोट इ. देण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

२७. वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत तसेच महानगरपालिका सांगेल अशी सर्व कामे मजुरांना करावी लागतील. तसे न केल्यास व्दितीय पक्षास सात दिवसांची लेखी नोटीस देऊन दंडात्मक कार्यवाही करुन सुरक्षा अनामत बँक गॅरेन्टी जप्त करुन निविदा रद्द करण्यात येईल.

२८. वृक्षांची निगा व देखभाल करणे कामाव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार महानगरपालिकेची इतर कामे करणेदेखील व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल.

२९. व्दितीय पक्ष ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेकामी महित्यातुन एक वेळा महिना पुर्ण झाल्यानंतर देयक तयार करुन लेखी देयक महानगरपालिकेला सादर करतील. सदर देयकाची रक्कम महानगरपालिका व्दितीय पक्षीय यांना देऊ करेल असे उभयपक्षीय यांनी मान्य केले. तसेच निविदाधारकाने प्रत्येक महिन्यात कंत्राटी कामगारांना महिन्याच्या १० तारखेच्या आतमध्ये मजुरांचे वेतन अदा करणे व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल अन्यथा निविदा रद्द करणेबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले सर्व कर भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

३०. Risk and Cost Clause:- ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम विहीत मुदतीत पूर्ण न झाल्यास प्रती दिन, प्रती मजुर रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर मात्र) याप्रमाणे दंड आकारण्यात येईल, हे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे. मजुर पुरवठा करण्याचे काम मुदतीत पूर्ण न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पक्षाकडुन काम करुन ज्यादा होणारा आकार व्दितीय पक्ष यांच्याकडुन वसूल करेल.

३१. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईदर महानगरपालिकेस क्षति झाल्यास व्दितीय पक्ष क्षतीपूर्ती हमी देत आहेत.

३२. निविदाधारकाने ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास व्दितीय पक्षीय यांना १५ दिवसांची नोटीस देऊन खुलासा मागविण्यात येईल. सदरचा खुलासा समाधानकारक नसल्यास व्दितीय पक्ष यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन व्दितीय पक्ष यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन सदरची कंपनी काळ्या यादीत टाकणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची स्पष्ट

Conciliation Act, १९९६ या कायद्याप्रमाणे होईल. सदर कामासंदर्भात उभय पक्षीयांच्या मध्ये वाद उद्भवल्यास मा. न्यायालय ठाणे जिल्हा कार्यक्षेत्र असेल.

११

३४. व्दितीय पक्षीय यांच्याकडुन नियमाप्रमाणे आयकर व इतर कर देयकातून कपात करण्यात येईल. निविदाधारकाने प्रदान करावयाच्या करामध्ये वाढ झाल्यास वाढीव रक्कम प्रदान करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३५. Safety requirements: ठेका मजुरांना काम करतेवेळी इजा, अपंगत्व, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Permanent Disability, Loss of Life etc. ) याची सर्व भरपाईची व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

३६. Financial & legal liability: निविदेतील आणि करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३७. Subcontract: व्दितीय पक्षीयांना ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रेक्टरला देता येणार नाही.

३८. सदर करारनाम्यात उभय पक्षीयांच्या संमतीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

३९. सदर निविदेमधील, करारनाम्यातील, कार्यादेशामधील व ठेका संबंधीत सर्व कागदपत्रातील सर्व मजकुर किंवा मुद्दे उभय पक्षीयांना बंधनकारक राहतील.

४०. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम अन्वये सदर करारनाम्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

४१. व्दितीय पक्षीयांनी नेमुन दिलेल्या प्रत्येक मजुराला कॉन्ट्रेक्टर लेबर अॅक्ट मध्ये नमुद केल्याप्रमाणे ओळखपत्र द्यावयाचे असुन कामाच्या प्रत्येक दिवशी सदर मजूरांनी ओळखपत्र त्यांच्याकडे ठेवण्याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

४२. व्दितीय पक्ष यांनी ठेका मजुरांना देण्यात येत असलेले किमान वेतन, त्याची तारीख, कामाची वेळ, ठेका मजुराचे नाव याचा गोषवारा तयार करुन त्याची एक प्रत प्रथम पक्ष यांना द्यावयाची आहे.संबंधीत ठेकामजुरांचा वेतनाचा कालावधी एक महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये.

४३. व्दितीय पक्षीयांना प्रत्येक मजुरास द्यावयाचे किमान वेतन प्रथम पक्ष यांनी नेमुन दिलेल्या कर्मचारी यांच्या समक्ष अदा करावयाचे आहे. सदर वेतन अदा केल्याची नोंद नमुना नोंदवहीत घेवुन जतन करावयाची आहे. त्याच प्रमाणे सदर नोंदवह्या सदैव पाहणीसाठी तयार ठेवायची आहे.

४४. कॉन्ट्रेक्टर लेबर अॅक्ट मध्ये विर्निदिष्ट केलेल्या सर्व सुविधा मजुरांना पुरविण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

४५. व्दितीय पक्ष यांना जनतेकडुन / व्यक्तीकडुन/ संस्थेकडुन त्यांनी केलेल्या कोणत्याही कामाबाबत कोणताही खर्च वसुल करता येणार नाही.

४६. वृक्षप्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी नेमुन दिलेली कामे करीत असताना ठेका मजुरास किंवा इतर कोणाचीही जिवीत व वित्तहानी झाल्यास त्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

४७. व्दितीय पक्ष यांनी यांच्या कडुन भरण्यात येणारी सुरक्षा अनामत रक्कम ठेक्याची मुदत संपेपर्यंत व त्यानंतर पुढील तीन महिन्यापर्यंत महानगरपालिकेकडे जमा राहील. सदर सुरक्षा अनामत रक्कम व बयाणा रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

४८. व्दितीय पक्ष यांनी महानगरपालिकेस पुरवठा करणाऱ्या मजुरांचे मासिक वेतन राष्ट्रीय किंवा शेड्युल्ड बँकेत जमा करणे बंधनकारक आहे व त्याचा संपुर्ण तपशिल प्रथम पक्ष यांना देणे बंधनकारक राहील.

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

12

म/९५३

४९. सदर कामी व्दितीय पक्ष यांनी भरलेले (EMD) अधिक सुरक्षा अनामत रक्कम असे एकुण ५% (अक्षरी पाच टक्के) करारनाम्यानुसार काम पुर्ण झाल्यानंतर व्दितीय पक्ष यांनी मुळ पावतीसह लेखी अर्ज केल्यानंतर नियमाप्रमाणे महानगरपालिकेने परत करायचे मान्य केले आहे. त्या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

५०. नैसर्गिक आपत्ती उदा. वारा, वादळ, पाऊस, पुर, विज पडणे, भूकंप, ज्वालामुखी, इ. व तसेच संप, संचारबंदी, इजा, अपघात यामुळे होणाऱ्या वित्तीय व मनुष्यहानीस व्दितीय पक्ष सर्वस्वी जबाबदार राहतील.

५१. सदर कामाचा कालावधी ०१ वर्षाकरीता राहिल. परंतू काही कारणास्तव सदर करारनाम्याचा कालावधी वाढवावा लागल्यास, व्दितीय पक्षीय यांचे काम समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहिल सदर वाढीव कालावधीच्या करारनाम्याची मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहिल.

५२. सदर करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क कायद्यानुसार योग्य ती मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहिल.

करारनाम्यातील वरील सर्व अटीशर्ती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांनी मान्य केल्या असून त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

सदरचा करारनामा आज दिनांक २९/१०/२०२१ रोजी चांगल्या मनःस्थितीत लिहून दिला आहे.

प्रथम पक्षीय

29/10

(संजय शिंदे)
उप आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सदस्य

1) Sanjay Therade

2) (Rakesh Shah)
(राकेश शहा)

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93

व्दितीय पक्षीय
(मे. हिरावती एंटरप्रायजेस)
चे प्रोप्रायटर श्री. सुशांत तिर्थराज यादव

१) नाव :- RAHUL YADAV
पत्ता :- B/801 RNA Heights, Mahavir Nagar, Andheri (E) Mumbai-...
भ्रमणध्वनी :- 9867336543

२) नाव :- SIDDHARTH
पत्ता :- B/15 NEW SHIV DARSHAN ANDHERI (W) MUMBAI-61
भ्रमणध्वनी :- 9322056609

सन २०२१/२२ / करारनामा रजिस्टर
अनु. क्र. ३८८ दि. २९/१०/२१ अन्वये
नोंद करण्यात आली.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

तळ मजला, प्रभाग समिती क्र. 04, कै. विलासराव देशमुख भवन, जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व)ता.जि.ठाणे - ४०१ १०७ , दुरध्वनी २८१०३४०९


## निविदा पत्रकाविषयी नियम व अटीशर्ती सन 2021 - 2022

1) निविदा पत्रका संबधीची सविस्तर माहिती संबधित खात्यातुन विनामुल्य मिळेल.
2) निविदा पत्रक किंमत (Receipt online system) ऑनलाईन सिस्टीमव्दारे भरण्यात यावी. चेकने रक्कम स्विकारली जाणार नाही. तसेच निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही.
3) निविदेसाठी EMD Receipt online system ऑनलाईन स्विकारण्यात येईल. चेकने किवा रोख रक्कम स्विकरली जाणार नाही.
4) निविदा बयाणा/सुरक्षा अनामत वर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकारले जाणार नाही.
5) निविदाधारकाने नेटवर डाऊनलोड केलेल्या निविदा पत्रकातच दर भरुन N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in वर सादर केले पाहिजे.
6) निविदाधारकाने त्यांचे नाव, संपुर्ण पत्ता व संपर्क दुरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती देणे आवश्यक आहे.
7) निविदाधारकाने निविदा पत्रात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. 1 ते 6 वृक्ष प्राधिकरण विभागास मजूर पुरवठा करणेबाबत दर प्रमाणक याची माहितीविहित केलेल्या नमुन्यात रकान्यात भरणे आवश्यक आहे.
8) निविदा सादर करताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.

<u>अ) लिफाफा क्र. 1.मध्ये</u> **(Envelop No. 1)**

1) Tender fee scan copy.
2) EMD deposit copy.
3) Average Annual Financial turnover of related services during the last three years. (2018-19,2019-20 & 2020-21) should be at least 30% (Thirty per cent) of the estimated cost. CA certificate for turnover to be submitted.(Estimated Cost Rs.2,50,00,000/-)
4) Work Experience Certificate of 30% Tender cost of Tree Plantation work last (2018-19,2019-20 & 2020-21) 3 years with Govt., Semi-Govt.,(Estimated Cost Rs.2,50,00,000/-)
5) Scanned attested copy of Labour licience valid certificate for at least 50 labours.
6) Scanned attested copy of Valid Employees Provident Fund Registration certificate and at least 50 labour ECR challan of last 1 year.
7) Scanned attested copy of the valid registration certificate of employment state Insurance valid and at least 50 labour with ECR Challan of last 1 yearl.
8) Scanned attested copy of valid Professional Tax (P.T.) Registration Certificate and at least 50 labour ECR Challan of Last 1 Year.
9) Attested copy of PAN card and Income Tax return of last 3 financial year. (2018-19,2019-20 & 2020-21)

<u>ब) लिफाफा क्र. 2.मध्ये</u> (Envelop No. 2)

1) **निविदा पत्रक दरसुची अटी- शर्तीसह सादर करणे.**
**निविदापत्रक दरसुची संकेतस्थळावर Online उपलब्ध करुन देण्यात येईल त्यामध्येच दर भरावेत.**

9. निविदाधारकाने निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे काम करणे बंधनकारक राहिल.
10. सदरचे काम हे महानगरपालिकेस करुन दिलेल्या करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार कार्यादेशामध्ये नमुद केल्यानुसार मुदतीत पुर्ण करुन द्यावयाचे आहे.

14

11. निविदाधारकाने करारनामां लिहून दिल्यातर महानगरपालिकेने मागणी केल्यास तात्काळ ठरवून दिलेल्या मुदतीत मजूर पुरवठा करणेबाबतचे काम केले पाहिजे. तसेच महानगरपालिकेने दैनंदिन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार कमी किंवा जास्त प्रमाणात मजूर पुरवठा करणेबाबत लेखी आदेश दिल्यास सदर आदेश निविदाधारकावर बंधनकारक राहतील.
12. महानगरपालिका निश्चित करीत अशा तारखेला व वेळेवर निविदा उघडण्यात येतील. त्या दिवशी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. ते गैरहजर असले तरी निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडताना प्रथम लिफाफा क्र. 1 उघडण्यात येईल. लिफाफा क्र. 1 मधील कागदपत्रे परिपुर्ण असल्यानंतरच लिफाफा क्र. 2 उघडण्यात येईल.
13. मंजूर निविदाधारकाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. 1, 2, 3, 4, 5 व 6 अंतर्गत विविध ठिकाणी मजुर पुरवठा करणेबाबतचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटींचा भंग केल्यास किंवा सदर कामासंबंधी विभागाकडुन तक्रार आल्यास मंजूर निविदाधारक म्हणजे व्दितीय पक्ष (L1) यांची अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन सदरचा कंपनीस काळ्या यादीत टाकण्यात येईल. तसेच (L2) कडुन सदर काम / पुरवठा करुन घेण्यात येईल व फरकापोटी असणारी रक्कम (L1) कडुन विहित पध्दतीने वसुल करण्यात येईल याची स्पष्ट नोंट घ्यावी.
14. कोणतीही निविदापत्रिका पुर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेचे आहेत. तसेच कोणतेही कारण न देता एक अथवा सर्वच निविदा रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने रोखुन ठेवलेला आहे.
15. प्रचलित शासकीय नियम पाळणे, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निविदाधारकावर बंधनकारक राहिल. तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने निविदाधारकाने संबंधीत कार्यालयाकडुन घेणे बंधनकारक राहील.
16. महानगरपालिकेच्या आदेशांची अंमलबजावणी करावी लागेल. महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने सर्व नियमाचे पालन करावे लागेल. महानगरपालिकेच्या हिता विरुध्द कार्यवाही करता येणार नाही. कार्यालयीन कामकाज गोपनीयता राखावी लागेल. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्याचा अधिकार उप. मुख्य. उद्यान अधिक्षक व मा. उप. आयुक्त (उद्यान), मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहील.
17. मुदतीचे आत अभिकर्त्याचा ठेका मुदतपुर्व रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला असून यासाठी 15 दिवसांची पुर्वसुचना देणेत येईल.
18. मंजूर ठेकेदारास कोणत्याही टप्यावर करार रद्द करावयाचा असल्यास आगाऊ 01 महिन्याची नोटीस देणे बंधनकारक राहिल.
19. ठेका मजूर बेजबाबदारीने काम करत असल्यास महानगरपालिकेने कळविल्यास तात्काळ त्यावर कारवाई करणे बंधनकारक राहिल.
20. निविधाधारकाची निविदा मंजुर झाल्यास निविदाधारकास नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क फी (स्टॅप पेपर) व 5% सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास (2% कार्यादेशापुर्वी व 3% चालु देयकातुन) तात्काळ कळविण्यात येईल. सात दिवसाच्या आतमध्ये स्टॅंप पेपर सादर करुन सुरक्षा अनामत रक्कम भरणे बंधणकारक राहील.
21. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. 1, 2, 3, 4, 5 व 6 अंतर्गत विविध ठिकाणी मजुर पुरवठा करणेकामी उभयपक्षामध्ये काही वाद उपस्थिती झाल्यास एक सदस्य लवाद म्हणुन काम पाहतील त्यांनी दिलेला निर्णय हा उभयपक्षीया वर बंधनकारक राहिल. सदर लवादाचे काम Arbitration and conciliation Act, 1996 या कायद्याप्रमाणे होईल. वादाचे ठिकाण ठाणे असेल याची नोंद घेण्यात यावी.
22. महानगरपालिकेने मागणी केलेल्या पत्रात नमुद केलेल्या मुदतीत ठेका मजूर पुरवठा न केल्यास प्रती मजूर रु.100/- (रु. शंभर मात्र) विलंब शुल्क आकारण्यात येईल.
23. safety requirements :- मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. 1, 2, 3, 4, 5 व 6 अंतर्गत विविध ठिकाणी मजुर पुरवठा

करताना कोणत्याही व्यक्तीस अथवा / कर्मचा-यास कुठल्याही प्रकारची इजा , अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Loss of Life) त्याबाबतची सर्व खर्चाची व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

24. Financial & legal liability:- करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तिय व कायदेशीर प्रश्न् निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.

25. Subcontract:- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागा अंतर्गत प्रभाग समिती क्र. 1, 2, 3, 4, 5 व 6 अंतर्गत विविध ठिकाणी मजुर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रक्टर / कंपनी / ठेकेदार / इतर व्यक्ती यांना देता येणार नाही.

26. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या ठेका मजूरांचा पगार, रजा, ग्रॅच्युइटी, बोनस, विमा योजना, पी.एफ., इ.एस.आय.सी. इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन व भत्ते देण्याची सर्व जबाबदारी निविदाधारकाची राहिल. याबाबत महापालिकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच कंत्राटदाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेतन दाखला (Pay Slip) देणे आवश्यक असेल.

27. ठेका मजूरांच्या गैर हजेरी मध्ये पर्यायी ठेका मजूर उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

28. मंजूर निविदाधारक यांना किमान वेतन अधिनियम - 1948 व वेतन नियम - 1963 मधील तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे.

29. किमान वेतन कायद्यातील (Minimum Wages Act, 1948) तरतुदीनुसार ठेकेदारांनी त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन देण्याची सर्व जबाबदारी ठेकेदारावर राहिल. तसेच ESIC, PF इत्यादी भत्ते व इतर शासकीय देणी रक्कमा भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल यासाठी महानगरपालिकेकडुन कोणत्याहि अतिरिक्त रक्कमेची मागणी करता येणार नाही.

30. निविदाधारकाने महानगरपालिकेच्या कामकाजासाठी नेमलेल्या ठेका मजूरांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट / ठेका तात्काळ रद्द करून त्याचे नाव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

31. मंजुर निविदाधारकाकडुन नियमाप्रमाणे सुरक्षा अनामत, आयकर व अन्य शासकीय नियमाप्रमाणे कर देयकातुन कपात करण्यात येतील.

32. निविदाधारकांनी अदा केलेल्या दर महा भविष्य निर्वाह निधी, गट विमा, इ.एस.आय.सी. भरल्याची पावती सादर करणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

33. निविदाधारकाने ठेका मजूरांचे वेतन दर महिन्याच्या 15 तारखेपर्यंत देणे निविदाकारावर बंधनकारक राहिल.

34. निविदाधारकाने ठेका मजूरास ओळखपत्र देणे बंधनकारक राहिल व सदर पत्रावर संबंधीत कर्मचाऱ्याचा फोटो व निविदाधारकाचे नाव असणे आवश्यक राहील.

35. निविदाधारकाने ठेका मजूरास प्रती मजूर साहित्य (कुऱ्हाड, कोयता, टिकाव, फावडा व घमेले) देणे बंधनकारक आहे.

36. निविदाधारकाने ठेका मजूरास गणवेश उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहिल. त्याकरीता महानगरपालिका कोणतीही जादा रक्कम देणार नाही. निविदाधारकाने निविदेचे दर सादर करताना सर्व खर्चासह प्रती मजूर, प्रती महा दर सादर करावयाचे आहेत.

37. निविदाधारकाने पुरवीलेल्या ठेका मजूर काम करीत असताना कायमस्वरुपी नोकरीसाठी कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क अथवा मागणी विचारात घेण्यात येणार नाही. याबाबत हमी पत्र देणे आवश्यक आहे.

38. सदरची निविदा मिळविण्याकरीता महानगरपालिका अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्याचे कोणत्याही क्षणी आढल्यास निविदाधारकास / यशस्वी निविदाधारक यांची निविदा रद्द करण्यात येईल व सदर निविदाधारक यांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल.

39. निविदाधारकाची निविदा नामंजुर झाल्यास त्याच्या EMD परत मिळविण्यासाठी मुळ पावतीसह अर्ज केल्यास त्वरीत परत करण्यात येतील. सदर EMD वर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही.

40. निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेतील नियम व अटी मान्य असल्याबददल त्यावर शिक्क्यासह सही केली पाहिजे. जर सही केली नसेल तर अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

41. सदर निविदेचा कालावधी 01 वर्षाकरीता राहिल. परंतू काही कारणास्तव सदर करारनाम्याचा कालावधी वाढवावा लागल्यास, निविदाधारक यांचे काम समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार उप. आयुक्त (मु.) यांस राहिल. सदर वाढीव कालावधीच्या करारनाम्याची मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी निविदाधारक यांची राहिल.

42. सदर करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क कायद्यानुसार योग्य ती मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी निविदाधारक यांची राहिल.

करारनाम्यातील वरील सर्व अटीशर्ती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांनी मान्य केल्या असून त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**उप-आयुक्त (मु.) (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रति,
मा. उप-आयुक्त सो.(उद्यान),
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प).

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वरील निविदेचे सर्व नियम व अटी मी / आम्ही वाचल्या असुन त्या संबधीची सर्व माहिती समजावुन घेतली आहे. निविदेसंबधी माझी / आमची कोणत्याही प्रकारची शंका राहिलेली नाही. सर्व शंकाचे निरसन झालेले आहे. हे निविदापत्रक लक्षपुर्वक भरले आहे.

वरील निविदांचे नियम व अटी मला / आम्हाला बंधनकारक व मान्य् आहेत.

दिनांक :-

निविदाधारकाची सही

शिकका :-

नाव :- ------------------------------------------

संपुर्ण पत्ता :- --------------------------------------

--------------------------------------

--------------------------------------